पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८
मा.शहर सुधारणा समिति
कार्यपत्रिका क्रमांक – २२

**सभावृत्तांत**

दिनांक : २०/०३/२०१३ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २०/०३/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. प्रशांत शितोळे
४) मा. गणेश लोंढे
५) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

याशिवाय मा.मोरे - प्र.उपनगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -**

**विषय क्र. २)** भूसंपादन करणेबाबत – मा. नितीन काळजे, मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ३)** प्रभाग क्र.६ मोशी मधील विकास आराखडयातील विविध रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत – मा. नितीन काळजे, मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ४)** प्रभाग क्र.६ मोशी प्रभाग समिती ठराव १३८ विषय क्र.३ नुसार रस्ता कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबत – मा. नितीन काळजे, मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक - मा.गणेश लोंढे　　　　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

बुधवार दिनांक ०३/०४/२०१३ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती** - बुधवार दिनांक ०३/०४/२०१३ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८

मा.शहर सुधारणा समिती

कार्यपत्रिका क्रमांक – २२

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०३/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक : ०३/०४/२०१३ वेळ : दुपारी २.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक २०/०३/२०१३ ची तहकूब सभा बुधवार दिनांक ०३/०४/२०१३ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. गणेश लोंढे

याशिवाय मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती :-** सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने सोमवार दिनांक ०८/०४/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**

सभापती

शहर सुधारणा समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८
मा.शहर सुधारणा समिति
कार्यपत्रिका क्रमांक – २२

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०३/२०१३ व ०३/०४/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक : ०८/०४/२०१३ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/०४/२०१३ ची तहकूब सभा सोमवार दिनांक ०८/०४/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. उल्हास शेट्टी
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

याशिवाय मा. गावडे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.ढगे, मा.तांबे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक **२०/०२/२०१३, २२/०२/२०१३ व ०६/०३/२०१३** रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक २०** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक **०६/०३/२०१३** रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक २१** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ८४ विषय क्रमांक : १

दिनांक : ०८/०४/२०१३ विभाग - नगररचना व विकास

सुचक : मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक : मा.उल्हास शेट्टी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/सांगवी/ड-२/६८/२०१३, दि.८/३/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे सांगवी येथील स.नं.९ व सांगवी गावठाण हद्दीवरील मंजूर विकासयोजनेतील प्रस्तावित केलेल्या ६.०० मी.रुंद रस्त्याने बाधीत होणा-या जमिनीचे संपादन महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) क किंवा १२६ (१) ग अन्वये करावे लागणार असल्याने सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेस तसेच सदर भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेच्या वतीने सादर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक - ८५ विषय क्रमांक : २

दिनांक : ०८/०४/२०१३

सुचक : मा. नितीन काळजे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या सन २००८ व २००९ च्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार मौजे चिखली येथील देहु-आळंदी रस्त्याला समांतर व कमर्शिअल झोन C2 चे शेजारुन देहू-आळंदी बीआरटीएस रस्ता व कुदळवाडी बीआरटीएस यांना जोडणारा ३० मी. रस्ता मंजूर झालेला आहे. देहू-आळंदी रस्त्यावरील सद्यस्थितीतील व भविष्यातील वाहनांची वर्दळ / घनता याचा विचार करता कुदळवाडी बीआरटीएस रस्त्यामधील गट क्र.८७९ ते देहू – आळंदी बीआरटीएस रस्त्यामधील गट नं. १५६९ पर्यंतच्या ३० मी. रुंद रस्त्याने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन होणे आवश्यक असल्याने सदर रस्ता रुंदीकरणाने बाधित जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व याकामी येणा-या खर्चास ( संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ) मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०८/०४/२०१३

सुचक : मा. नितीन काळजे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६ मोशी मधील विकास आराखडयातील पुढील रस्त्यांचे १) विकास आराखडयातील ३० मी. मोशी-देहू रस्त्यालगत उत्तरेकडे जाणारा २४ मी. रस्ता गट नं.१३१४ (जूने) मधून पुन्हा पूर्वेकडे जाणारा १८ मी. रस्ता गट क्र.१३१८, १३२७, १३२१, १३२३, १३२९, १३४६ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, २) विकास आराखडयातील १९ मी. मोशी देहू रस्त्यालगत उत्तरेकडे जाणारा १८ मी. रस्ता गट क्र.१३४१, १३४३, १३४६ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, ३) विकास आराखडयातील ३० मी. मोशी आळंदी रस्त्यालगत २४ मी.व ३० मी. रस्त्याचे चौकाला जोडून दक्षिणेकडे गट क्र.२९२, २५८, २९३, २९१, २७१ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, ४) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.६९४, ६५८, ६५०, व ६६२ (जूने) पर्यंत पुढे १८ मी. गट क्र. ३६४, ३६७, ३६८, ३७७, ३८० व ३४० (जूने) पर्यंत भूमिसंपादन करणे, ५) विकास आराखडयातील २४ मी. रस्ता गट क्र.४८, ६१, ६२, ६३, ६४ व ६५ (जूने) भूमिसंपादन करणे, ६) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.६१३, ६१४ व ६१२ (जूने) भूमिसंपादन करणे, ७) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.७५१, ७५३, ७४६, ७३२, ७२२ व ९४० (जूने) भूमिसंपादन करणे, ८) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र.७९१, ७९२, ९३४, ९३३, ९७०, ९६९, ९९२ व ९९३ (जूने) भूमिसंपादन करणे, ९) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र. ५३०, ५३१, ५१८, ५३३, ५३४, ५३६ व ५४० (जूने) भूमिसंपादन करणे, १०) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र. ५०४, ५०६ व ५०७ (जूने) भूमिसंपादन करणेस मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०८/०४/२०१३

सुचक : मा. नितीन काळजे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग समिती ठराव १३८ विषय क्र.३ नुसार प्रभाग क्र.६ मोशी येथील पुणे नाशिक रस्त्यास जोडून गट क्र.५०, ५१ व ५३ (जूने) या गटातून पूर्वेकडून जाणारा २० फुटी रुंद २५० मी. लांब रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३७५ /२०१३
दिनांक : ०८/०४/२०१३

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.